# भारतीय जनता पक्ष

**(केंद्रिय कार्यालय)**

**11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001**

**फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787**

भाजपचे अध्यक्ष श्री राजनाथ सिंह यांचे प्रेस वक्तव्य

व्यापक भ्रष्टाचार आणि ते झाकण्यासाठीचे प्रयत्न.

युपीए सरकार मोठमोठ्या घोटाळ्यामुळे प्रसिद्ध झाली आहे. रु.55,000 अब्ज घोटाळ्यामुळे युपीए सरकार स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वात मोठी भ्रष्ट सरकार बनली आहे. सरकारच्या अविरत भ्रष्टाचारामुळे आपल्या देशाचे सर्व प्रशासकीय कामकाजात जोखिम निर्माण झाली आहे. दुर्देवाने युपीए सरकार कोणतेही पर्याय नसताना अशा परिस्थितीत आतापर्यंत भ्रष्टाचारी लोकांना पाठीशी घालत आहे.

सध्या भ्रष्टाचार आणि आवक पाहता अधिक संपत्ति जमा केल्याच्या प्रकरणात दोन केंद्रिय मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. पंतप्रधानांनी या कलंकित मंत्र्यांना विनाविलंब हाकलले, त्याचे कारण असे की, संसदेत बजेट सत्रात वाचवणे असे आहे. धान्य, सुरक्षा बिल आणि जमीन संपादन बिलासारखे अनेक महत्त्वाचे बिल चर्चेसाठी पेंडिंग आहेत. त्या बिलांना संसदेत मंजुरी मिळू शकत होती पण युपिए सरकारने ती संधी झिडकारली. पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांनी ज्या प्रकारे रेल्वे मंत्र्यांचा बचाव केला त्यामुळे जनतेच्या मनात अनेक प्रश्नं उपस्थित होत आहेत. पंतप्रधानांना माहित होते की रेल्वे मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल. पंतप्रधानांना माहित आहे की रेल्वेमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला, असे असताना त्यांना पाठिशी घालण्यात आले. कॉंग्रेसला जवळपास 17 वर्षानंतर रेल्वे मंत्रालय हाती आले. रेल्वे प्रवासी भाड्यात वाढ करण्याबरोबरच पहिल्यांदा रेल्वे मंत्रालयात वरिष्ठ अधिका-यांच्या नियुक्तित भ्रष्टाचाराचा घोटाळा बाहेर पडला.

संपूर्ण सिस्टिम धोक्यात

सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयला सरकारच्या पिंज-यातील पोपट म्हटले आहे व्यापक भ्रष्टाचार आणि ते झाकण्यासाठीचे प्रयत्न.

युपीए सरकार मोठमोठ्या घोटाळ्यामुळे प्रसिद्ध झाली आहे. रु.55,000 अब्ज घोटाळ्यामुळे युपीए सरकार स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वात मोठी भ्रष्ट सरकार बनली आहे. सरकारच्या अविरत भ्रष्टाचारामुळे आपल्या देशाचे सर्व प्रशासकीय कामकाजात जोखिम निर्माण झाली आहे. दुर्दैवाने युपीए सरकार कोणतेही पर्याय नसताना अशा परिस्थितीत आतापर्यंत भ्रष्टाचारी लोकांना पाठीशी घालत आहे.

सध्या भ्रष्टाचार आणि आवक पाहता अधिक संपत्ति जमा केल्याच्या प्रकरणात दोन केंद्रिय मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. पंतप्रधानांनी या कलंकित मंत्र्यांना विनाविलंब हाकलले, त्याचे कारण असे की, संसदेत बजेट सत्रात वाचवणे असे आहे. धान्य, सुरक्षा बिल आणि जमीन संपादन बिलासारखे अनेक महत्त्वाचे बिल चर्चेसाठी पेंडिंग आहेत. त्या बिलांना संसदेत मंजुरी मिळू शकत होती पण युपिए सरकारने ती संधी झिडकारली. पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांनी ज्या प्रकारे रेल्वे मंत्र्यांचा बचाव केला त्यामुळे जनतेच्या मनात अनेक प्रश्नं उपस्थित होत आहेत. पंतप्रधानांना माहित होते की रेल्वे मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल. पंतप्रधानांना माहित आहे की रेल्वेमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला, असे असताना त्यांना पाठिशी घालण्यात आले. कॉंग्रेसला जवळपास 17 वर्षानंतर रेल्वे मंत्रालय हाती आले. रेल्वे प्रवासी भाड्यात वाढ करण्याबरोबरच पहिल्यांदा रेल्वे मंत्रालयात वरिष्ठ अधिका-यांच्या नियुक्तित भ्रष्टाचाराचा घोटाळा बाहेर पडला.

संपूर्ण सिस्टिम धोक्यात

सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयला सरकारच्या पिंज-यातील पोपट म्हटले आहे.

त्या मुद्द्याकडे भाजप जनतेचे लक्ष केंद्रित करु इच्छिते. सीबीआयचा चौकशी अहवाल कायदा मंत्री, पंतप्रधान कचेरी आणि अन्य अधिका-यांना दाखवण्याची

गरज पडते. सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालात कोळसा खाण वाटप घोटाळ्यात अश्विन कुमार आणि अन्य अधिका-यांनी छेडछाड केली आहे. युपीए सरकारने कायद्याची गाडी पटरीवरुन कशी उतरेल अशी व्यूहरचना केली आहे. सरकारने असे समजले पाहिजे की न्यायव्यवस्था आपल्या लोकशाही पद्धतीचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अभिप्रायाने कायदा मंत्रीच नाही तर पंतप्रधान पण बिकट परिस्थितीत आले आहेत. कायदा मंत्री आणि अन्य अधिका-यांनी पंतप्रधानांना वाचवण्यासाठी कोळसा घोटाळ्यातील अहवालाचा महत्त्वाचा भाग बदलला. श्री अश्विनी कुमार यांच्या राजीनाम्यानंतर संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश झाला. भाजप मानतो की पंतप्रधानांकडून ध्यान अन्यत्र वळवण्यासाठी श्री अश्विनीकुमार आणि श्री पवन बंसल यांना बळीचा बकरा बनवण्यात आले आहे.

कोळसा घोटाळ्यातला सीबीआयचा अहवाल पंतप्रधान कचेरीच्या अधिका-यांच्या हाजरीत कायदा मंत्र्यांनी कशासाठी फिरवला.

का हा प्रयत्न याआधी कोळसा खाते सांभाळलेल्या पंतप्रधानांना वाचविण्यासाठी केला का. टु-जी स्पेक्ट्रम घोटाळ्यात ए.राजाला संयुक्त संसदी समिती समोर उपस्थित का नाही करण्यात आले.

पंतप्रधान स्वता संयुक्त संसदीय समिती समोर उपस्थित राहण्याचे बोलले असताना आता का बरे तयार होत नाहीत.

या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत.

कॉंग्रेस सरकारमध्ये भ्रष्टाचाराचा हा काही पहिलाच प्रसंग नाही. दिवंगत राजीव गांधी आणि दिवंगत पी.व्ही.नरसिंह राव यांच्या शासनकाळात पण भ्रष्टाचार झाल्याचा आरोप झाला होता. मात्र त्यावेळी परिस्थिती फार वेगळी होती, कारण की सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण सिस्टीम मध्ये जोखीम निर्माण झाली आहे. भारतीयांचा संपूर्ण सिस्टम विषयी त्वरित विश्वास उडाला आहे. भाजप जबाबदार विरोधी पक्ष म्हणून मानते की भारतीय लोकशाहीतील सर्व सहभागींनी राजकारणापासून वर उठून आपल्या राजकीय सिस्टमची प्रतिष्ठा पुनःस्थापित होईल अशा प्रकारे प्रयत्न केले पाहिजेत. पंतप्रधान डॉ.मनमोहन

सिंह यांनी संपूर्ण राजकीय सिस्टम बद्दल जनतेचा विश्वास पुनःस्थापित होईल असे प्रयत्न केले पाहिजेत. असे माझे विनम्र सूचन आहे.
सरकारने नैतिक शक्ति हरवली आहे, फक्त संख्याबळाच्या जोरावर ती टिकून आहे. युपीएचे संख्याबळ उत्तर प्रदेशातील दोन मोठे पक्ष- समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षावर आधारित आहे.
सिस्टमची बिकट अवस्था लक्षात घेऊन त्या दोन्ही मोठ्या पक्षांना माझी नम्र विनंती आहे की जनतेची फरियाद आणि परिस्थिती लक्षात घेऊन युपीए सरकारचा पाठिंबा मागे घ्यायला हवा. नाहितर जी भयानक परिस्थिती उद्भवेल त्याकरिता दोन्ही पक्ष तेवढेच जबाबदार आहेत.
युपीए सरकारची विश्र्वसनीयता इतकी घटली आहे की अश्र्विनीकुमार आणि पवन बंसल यांच्या राजीनाम्याने ती पूर्ववत होईल याची अपेक्षा नाही.
संसदेत उठलेल्या आवाजाची गुंज सरकारच्या बहि-या कानात पडत नसल्याने भाजपने आता जनतेपर्यंत पोचण्याचा निर्धार केला आहे. भाजप येत्या 27 मे पासून 2 जून दरम्यान देशव्यापी आंदोलन आणि जनजागृती अभियान हाती घेणार आहे. युपिए सरकारचे गैरप्रशासन, निष्क्रियता आणि व्यापक भ्रष्टाचारच्या विरोधात भाजप धरणे धरणार आहे, आणि जेलभरो आंदोलन पण करणार आहे.

<u>राष्ट्रीय सुरक्षे समोर जोखीम</u>

युपीए सरकारची राष्ट्रीय सुरक्षे बाबत जी परिस्थिती उद्भवली आहे ती इतकीच जोखमेची आहे. आपल्या आंतरराष्ट्रीय सीमेवर वारंवार घूसखोरी होत आहे. हल्लीच लदाख मधील दौलत बेग ओल्डी परिसरात चीनच्या लष्करी दलाची घुसखोरीचे ज्वलंत उदाहरण आहे. असे असताना राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे तीन आठवड्यापासून कोणतेच ठोस पावले उचलण्यात आली नाहीत. सरकार आता असा दावा करत आहे की चीन सोबतचा प्रश्न सोडवण्यात आला आहे. मात्र प्रसार माध्यमांत असा अहवाल आला आहे की गुप्त सौद्याचा भागरुपे चीनने त्या विस्तारात सैनिकांचे प्रमाण कमी केले आहे. आपल्याला चीनबाबत सरकारला संपूर्ण नैतिक पाठिंबा दिला पाहिजे.

विदेश मंत्री सलमान खुर्शीद चीनच्या अधिकृत दौ-यावर गेले आहेत. चीनचे सैनिक आपल्या सीमेत घुसखोरी करत असल्याचा मुद्दा त्यांनी चीनच्या सत्ताधा-यांपुढे उठवतील अशी अपेक्षा होती, परंतु नाराजीची गोष्ट अशी आहे की, त्यांनी राजकीय चर्चेत ती गोष्ट उच्चारलीच नाही.

लदाख मध्ये हे पहिल्यांदा नाही घडले आहे. संपूर्ण चित्र व्यापक दृष्टिने पाहणे गरजेचे आहे. चीन पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये स्वताचे सैन्य तैनात करण्यासाठी पाकिस्तानातील ग्वादर बंदरात प्रशासकीय कब्जा केला आहे. चीन अजुनही अरुणाचल प्रदेशातील हिश्श्यावर स्वतःचा दावा करत आहे. भाजप युपीए सरकारच्या या विषयीच्या निष्क्रियतेबद्दल गंभीर चिंता व्यक्त करीत आहे. भारताच्या व्यूहात्मक हिताच्या रक्षणासाठी परिणामकारक पावले उचलण्याची मागणी पण भाजप करत आहे.

चीन असो किंवा पाकिस्तान, नेपाळ असो किंवा श्रीलंका किंवा मालदीव सर्व शेजारील देशाबरोबरचे राजकीय संबंध युपीए सरकारच्या शासनकाळात घटले आहेत.

एनडीए सरकारच्या शासनकाळात भारताची विदेश नीति व्यापक आणि सक्रिय होती एवढेच नाही तर त्यात दीर्घदृष्टी आणि आदर्श पण होता. आता युपीए सरकारने तो पाया संपूर्णपणे नष्ट केला आहे. जर युपीए सरकार सत्तेत अधिक काळ राहील तर संरक्षण आणि राजकीय क्षेत्रातील दुर्बल नीतिमुळे राष्ट्रीय सुरक्षेसमोर मोठी जोखीम निर्माण होईल. खास करुन 2014 मध्ये अफगाणिस्तान मधून नाटोचे सैन्य हटविण्यात येणार आहे त्यानंतर खुप बिकट परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे.

(ओ.पी.कोहली)

हेडक्वार्टर ईन्चार्ज